नि.फौ. ख. क्र. १८७/२०२५
सरकार ..वि.. सुहास
निशाणी क्र.३६

नि. फौ. ख. क्र.१८७/२०२५
सरकार .. वि.. सुहास

निशाणी क्र. ३६

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – स्नेहल सुहास भगेवार,

वय – २२ वर्षे, व्यवसाय – घरकाम,

पत्ता – राजंदा, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती एन. एम. राऊत यांचेमार्फत सरतपास सुरुः**

मी आरोपींना ओळखते, कारण ते माझे नातेवाईक आहेत. माझे व आरोपी क्र.१ सोबत लग्न दि.१६.०५.२०२३ रोजी झाले. त्यानंतर मी पुणे येथे एकत्रित कुटुंबात माझ्या सासरी नांदावयास गेली. सदर घटना केव्हा घडली होती हे मला आठवत नाही. मला घटनेची नेमकी तारीख, वर्ष किंवा वेळ आठवत नाही. असे घडले नव्हते की, आरोपींनी मला शारिरिक व मानसिक त्रास दिला, तसेच पैशाची मागणी केली. असे घडले नव्हते की, आरोपींनी मला व माझ्या नातेवाईकांना जिवे मारण्याची धमकी दिली. पोलीसांनी माझा जबाब नोंदविला होता.

**२.** आता मला जबानी रिपोर्ट व छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर पोलिसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीला होता किंवा नाही मला आठवत नाही. त्यास सहीपुरता अनुक्रमे **निशाणी ३७ व ३८** देण्यात येते.

(**साक्षीदार त्याचे मुळ कथनाशी विसंगत साक्ष देत असल्याने सरकारी वकीलांच्या विनंतीवरुन उलटतपास स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी दिली.**)

**३.** हे म्हणणे खरे नाही की, लग्नामध्ये माझ्या आई वडीलांनी मला भेट वस्तू म्हणून ५ ग्रॅम सोन्याची अंगठी, १० ग्रॅम सोन्याची पोत, ११ ग्रॅम सोन्याची चैन, दिड ग्रॅम नथ व ४ ग्रॅम सोन्याचे कानातले असे एकूण १,६९,०७०/– रुपयांचे सोने लग्नामध्ये भेट म्हणून दिले. हे म्हणणे खरे नाही की, तसेच लग्नामध्ये माझ्या आई वडीलांनी नगदी १,५१,०००/– रुपये दिले. हे म्हणणे खरे नाही की, गृहउपयोगी वस्तु भेट म्हणून

दिले, माझ्या वडीलांना अंदाजे लग्नाचा खर्च पाच ते सहा लाख रुपये आला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला काही दिवस चांगली वागणुक दिली व त्यानंतर मला हुंडा कमी दिला तसेच लग्न आमच्या लायकीनुसार झाले नाही म्हणून माझा शारिरीक व मानसिक छळ केला. हे म्हणणे खरे नाही की, लग्नानंतर मला कळाले की, माझ्या पतीचे साक्षगंध होवुन लग्न तुटले होते, तसेच माझ्या पतीचे अविवाहीत स्त्री सोबत संबंध होते, सदरील बाब मी त्याच्या नातेवाईकांना सांगितली असता त्यांनी मला चुपचाप सहन करायला सांगितले.

**४.** हे म्हणणे खरे नाही की, मला दिवस राहु नये म्हणून खाण्यापिण्याच्या वस्तूमध्ये औषध दयायचे, वरील सर्व बाबी मी माझ्या आईवडीलांना सांगितल्या या कारणावरुन आरोपींनी मला व माझ्या नातेवाईकांना जिवे मारण्याची धमकी दिली. हे म्हणणे खरे नाही की, मागील १० महीन्यापूर्वी मला आरोपी क्र.१ याने माहेरी आणुन सोडले, त्यावेळी मला माझ्या पतीकडुन एक मुलगा नामे विवान झाला. हे म्हणणे खरे नाही की, अशा प्रकारे वरील आरोपींनी माझा शारिरिक व मानसिक छळ केला म्हणून मी त्यांच्याविरुध्द पोलीस स्टेशन बार्शिटाकळी येथे तक्रार दिली, त्यानंतर मला आरोपींनी भरोसा सेल कक्ष पोलीस अधिक्षक कार्यालय येथे समेट करण्याकरीता पाठविले, त्यावेळी मी तेथे लेखी कैफीयत दिली होती, त्यास **नि.क्र.३९** देण्यात येते, परंतू तेथे आमचा समेट झाला नाही.

**५.** आता मला माझे बयाण दाखविण्यात आले, पोलीसांनी माझ्या बयाणातील अधोरेखांकित **भाग–अ** का लिहीला याचे कारण मी सांगू शकत नाही.

**६.** हे म्हणणे खरे आहे की, केस आपसात करण्यासाठी **निशाणी ३४** वर अर्ज दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे व आरोपींचे न्यायालयाबाहेर आपसी तडजोड झाली आहे. त्याबाबत अभिलेखावर पुरसिस **निशाणी ३५** दाखल केली आहे.

त्यावर माझी स्वाक्षरी आहे. हे म्हणणे खरे नाही की, आपसी तडजोड झाल्यामुळे आरोपींना वाचविण्याकरीता मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**अभियोग पक्षातर्फे सरतपास पुर्ण.**

**आरोपींतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. व्ही. आर. राठोड यांनी नाकारला.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

स्वा/–
(एम. के. कुरे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
बार्शिटाकळी

बार्शिटाकळी.
दि. १८/०५/२०२६